# वार्षिक अहवाल २००९–२०१०

(१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०)

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा इ.सन २००९–१० सालचा वार्षिक अहवाल सादर करण्यास नियामक मंडळास अतिशय आनंद होत आहे.

## नियामक मंडळ सभा

नियामक मंडळाच्या एकूण पाच सभा व एक विशेष सभा (नियामक मंडळ सदस्यांची कार्ये आणि जबाबदा-या या विषयासाठी) घेण्यात आली. या सभांना मुंबई व मुंबईबाहेरील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. सभेत महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

## कार्यकारी समिती सभा

कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सदस्य कार्यपरत्वे नाटय परिषदेच्या कार्यालयात हजर राहून निरपेक्ष भावनेने परिषदेचा कार्यभार सांभाळीत आहेत. त्यामुळे नाटय सृष्टीच्या सर्व घटकांचा परिषदेच्या कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. कार्यकारी समितीच्या नऊ सभा झाल्या. १४ जून २००९ चा भव्य कलावंत मेळावा व पारितोषिक वितरण समारंभ, व नाटयसंमेलन हे परिषदेचे महत्वपूर्ण उपक्रम होय.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २९ नोव्हेंबर २००९ रोजी दुपारी २.३० वाजता परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अ.भा. मराठी नाटय परिषद, यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल, मनमाला टँक रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे घेण्यात आली. सभेत वार्षिक जमाखर्च, अहवाल इत्यादि कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांवर चर्चा होऊन विविध ठराव संमत करण्यात आले.

## आजीव सभासद

परिषदेची एकूण सभासद संख्या दि. ३१.०३.२०१० अखेर १४९२८ झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| संस्था सभासद | १० | उपकर्ते | १७ |
| आश्रयदाते | १६ | हितचिंतक | ०८ |
| मध्यवर्ती आजीव सभासद | ४१०२ | सन्माननीय सभासद | ११ |
| शाखा आजीव सभासद | १०७६४ | | |

## आर्थिक मदत

आवश्यकतेनुसार गरजू व वृध्द कलावंतांना नाटय परिषद आर्थिक सहाय्य करीत असते.